# NSS-2015-16

## YOUTH DAY-SWAMI VIVEKANAND JAYANTI

The NSS unit of Dhole Patil College of Engineering organizes Swami Vivekanand Jayanti.

We celebrate Swami Vivekanand's Jayanti as 'National Youth Day'.Thoughts of Swami Vivekanand always inspire and motivate us.



# REPUBLIC DAY

On the occasion of Republic Day, NSS unit conducted Program.

NSS Team of 150 Students along with Program Officer Shrikant Jagtap gave their vital involvement in the program.

Along with Chief Guest, Chairman Shri.Sagar Sir and Principal of college were present for the program.



# BLOOD DONATION CAMP

Blood Donation camp is organized by NSS unit of DPCOE in the collaboration of Sasoon Hospital,Pune.

Over 110 students and 20 teachers donated their blood.

NSS Program officer Shrikant Jagtap organized the program.



वाघोली : ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले सामाजिक कर्तव्य बजावले.

## रक्तदानामुळे मिळते रक्तातील आजाराची माहिती – शंकर मुगवे

**पुणे** – रक्तदानामुळे आपल्या रक्ताची नियमितपणे तपासणी होते त्यामुळे बरेचसे आजार आपणांस पहिल्याच पायरीवर कळण्यास मदत होते, अशी माहिती ससून रक्तपेढीचे शंकर मुगवे यांनी विद्यार्थ्यांना दिली. वाघोली येथील ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने चेअरमन सागर ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. ससून सर्वोपचार रुग्णालयातील 'रक्तपेढी'च्या सहकार्यातून हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन सागर ढोले पाटील, प्राचार्य डॉ. सतीश अल्लमपलेवार, उपप्राचार्य अभिजीत दंडवते, प्रा.श्रीकांत जगताप, ससून रक्तपेढीचे कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# MAHATMA PHULE JAYANTI

Mahatma Jyotirao Phule work for education through his life.

So, in the remembrance of Mahatma Phule we celebrated his birth anniversary in college. NSS unit of college organizes the program.

संक्षिप्त



म. फुलेंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना आ. मेधा कुलकर्णी, प्राचार्य सतीश अलमपल्लेवार आदी.

## महात्मा फुलेंना जयंतीनिमित्त अभिवादन

**पुणे :** महात्मा जोतिबा फुले जयंती निमित्त ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय वाघोली येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. या वेळी प्राचार्य सतीश अलमपल्लेवार, उपप्राचार्य प्रा. अभिजित दंडवते, प्रा.प्रकाश माळी, मानव संसाधन विभाग प्रमुख अंजली वत्स, प्रा.आरती दंडवते, प्रा.शिवानी पंडिता, प्रा. प्रांजली कुलकर्णी, प्रा. सुप्रिया शेळके, प्रतिमा भाटी, किया दास, माधवी रेपल, मोनाली चिंचमलाटपुरे आदी उपस्थित होते.

# WORLD ENVIRONMENT DAY

It’s our duty to protect the environment. World Environment Day Program organized by NSS unit of DPCOE aimed at spreading awareness among the entire student about environment.

NSS unit conducted tree plantation program on that day.



## पर्यावरणाची होणारी हानी घातक

**डॉ. रामभूज यादव** शाश्वत विकासावर व्याख्यान

पुणे : भारतामध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. परंतु निसर्ग संवर्धनाबाबत अतिशय निष्काळजीपणा होताना दिसून येतो. पर्यावरणाची सध्याची परिस्थिती लक्षात न घेता विकासाच्या दिशेने आपण वाटचाल करीत आहोत, त्यामुळे भविष्यात याची किंमत भारताला मोजावी लागणार आहे. पर्यावरणाची होणारी हानी ही अतिशय चिंतेची बाब आहे. याबाबत आपण त्वरीत पाऊल उचलायला हवे, असे प्रतिपादन युनेस्कोचे भारतातील कार्यक्रम तज्ज्ञ डॉ. रामभूज यादव यांनी केले.ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात शाश्वत विकास आणि शाश्वत जीवनशैली या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

तेर पॉलिसी सेंटरच्या डॉ. विनीता आपटे, जेएसडब्ल्यू फाऊंडेशनच्या रुपा दावने, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, संचालक ब्रिगेडियर डॉ. रणबीर भाटिया, सचिव उमा ढोले पाटील, प्रा. डॉ. अभिजित दंडवते, अरुणा वर्मा, भूषण करमकार आदी उपस्थित होते.डॉ. यादव म्हणाले की, प्रदूषणनिर्मितीमध्ये चीन आणि अमेरिकेनंतर तिसरा क्रमांक भारताचा आहे. मागील वर्षी भारतातील कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण वाढले होते. आपल्याला पृथ्वीतलावर जगायचे असेल तर कार्बनडायऑक्साईडचे वाढते प्रमाण मर्यादित ठेवायला हवे. यासाठी देशभरात सौर ऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढायला हवी.रुपा दावने म्हणाल्या, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी अगदी छोट्या गोष्टींची सुरुवात स्वत:पासून करायला हवी. प्लॅस्टिकचा नियंत्रित वापर, पाण्याचा नियंत्रित वापर, निरुपयोगी वस्तूंचा पुर्नवापर आदी गोष्टी आपण अंगिकारणे गरजेचे आहे. पर्यावरणाची सर्वांना काळजी घेतली पाहिजे.सक्षमपणे उभा राहिले पाहिजे. पर्यावरण जर योग्य असेल निसर्गरम्य वातावरण असले पाहिजे.

**सौर ऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढावी**



**भारतातील पर्यावरण हानी चिंतेची बाब**

# INDEPENDENCE DAY

Independence day is celebrated in DPCOE on 15th August 2015.

The program is organized by NSS team.



# WOMAN EMPOWERMENT PROGRAM

NSS unit of DPCOE organizes a program on woman empowerment.

Volunteers performed street plays during the program.

## तरुणाईने पथनाट्यातून मांडल्या स्त्रियांच्या व्यथा

### महाराष्ट्र राज्य महिला आयोग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सहभाग



ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने मुलगी झाली हो..! या पथनाट्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

पुणे : स्त्रीभ्रूण हत्येपासून ते आयटीसह अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या सुशिक्षित महिलांवर शहरांत होणारे अत्याचार आणि ग्रामीण भागात मुलगा-मुलगी असा भेदभाव करीत मुलींकडे होणारे दुर्लक्ष, अशा 'ती'च्या व्यथा मुलगी झाली हो..! या पथनाट्यातून महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी मांडल्या. प्रत्येक क्षेत्रात आज स्त्रिया आघाडीवर आहेत. त्यामुळे ग्रामीण असो वा शहरी भाग कोणत्याही ठिकाणच्या स्त्रियांमध्ये असलेली अस्वस्थता दूर करीत समाजाने त्यांना मानाचे स्थान द्यावे, असे सांगत स्त्रीशक्तीचा जागर विद्यार्थ्यांनी केला.

निमित्त होते ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित महिला सशक्तीकरण या विषयावरील पथनाट्य आणि व्याख्यानाचे. यावेळी दीपस्तंभ या सामाजिक संस्थेच्या डॉ. वृषाली रणधीर, डीपीसीओईचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, संचालक डॉ. रणबीर भाटिया, सचिव उमा ढोले पाटील, प्रा. श्रीकांत जगताप, डॉ. आरती दंडवते आदी उपस्थित होते.

यावेळी नोकरीच्या ठिकाणी होणारे महिलांचे शोषण या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वृषाली रणधीर म्हणाल्या, महिलांसाठी केलेल्या विविध कायद्यांमुळे महिला सुरक्षित झाल्या असल्या, तरीही महिलांवरील अत्याचार कमी होत नाहीत. अनेक वेळा महिला आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराविषयी मोकळेपणाने बोलत नाहीत आणि कायद्याचा आधार देखील घेत नाहीत. परंतु असे न करता त्यांनी अत्याचाराविरोधात पुढे यायला हवे आणि कायद्याचा योग्य वापर करायला हवा. यावेळी त्यांनी महिलांविषयक विविध कायद्यांविषयी मार्गदर्शन केले.

उमा ढोले पाटील म्हणाल्या, महाविद्यालयीन जीवनात तरुणींचे सक्षमीकरण केल्यास पुढील काळात येणाऱ्या अडचणींचा त्या सामना करू शकतील. मुलींसोबतच मुलांनीदेखील सामाजिक जीवनात वावरताना एक जबाबदार नागरिक म्हणून वागले पाहिजे.

## पथनाट्यातून महिलाशक्तीचा जागर

स्त्री भ्रूणहत्येपासून ते आयटीसह अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या सुशिक्षित महिलांवर शहरांत अत्याचार होत आहेत, तर ग्रामीण भागात मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जात आहे. यावर 'मुलगी झाली हो!' या पथनाट्यातून भाष्य करण्यात आले. सर्वच ठिकाणी महिलांचा सन्मान करावा, असा संदेश या वेळी देण्यात आला. निमित्त होते, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिला सशक्तीकरण' या विषयावरील पथनाट्य आणि व्याख्यानाचे. या वेळी डॉ. वृषाली रणधीर, डीपीसीओईचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, संचालक डॉ. रणबीर भाटिया, सचिव उमा ढोले पाटील, प्रा. श्रीकांत जगताप, डॉ. आरती दंडवते उपस्थित होते.

# TEACHERS DAY

NSS unit organizes Teachers day on 5th September 2016 in DPCOE.



# GANDHI JAYANTI

NSS unit of Dhole Patil College of Engineering celebrated Gandhi Jayanti by spreading awareness about road safety and traffic rues.

Program was conducted by NSS Program officer Shrikant Jagtap.50 NSS volunteers are participated in the rally.Program is collaborated with Gandhi Smarak Nidhi.



# ROAD SAFETY AWARENESS

Awareness about road safety is very much important as accidents were increasing enormously.

Everyone should follow the road safety rules and regulations.

NSS unit of DPCOE organizes a rally for road safety awareness.



# TREE PLANTATION

As we know Tree Plantation is the need of age.NSS team of DPCOE conducted the program of Tree Plantation.

Over 50 Trees were planted by the team of 40 students.



# SWACHHATA ABHIYAN

NSS team conducted cleanliness program in the nearer area of college.

50 students of NSS team and 6 teachers were participated in the Swachhata Abhiyan.

## ढोले पाटील अभियांत्रिकी महविद्यालयात स्वच्छता अभियान

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त वाघोली येथील ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान राबविले. या मोहिमेंतर्गत ढोले पाटील रस्ता, जहांगीर हॉस्पिटल चौक, ताडीवाला रोड, पुणे स्टेशन परिसरात वाहतुकीच्या समस्या, आरोग्य व स्वच्छतेविषयक जनजागृती करण्यात आली.

स्टेशन येथील महात्मा गांधींच्या पुतळ्यास तरुण विकास मंडळ ट्रस्टचे मृणाल ढोले पाटील, रोहन ढोले पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. या वेळी ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन सागर ढोले पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत जगताप यांनी केले होते. या वेळी सेक्रेटरी उमा ढोले पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी नयन वाघ, प्रतीक्षा डांगट, दीक्षा धानोरकर, मयूर क्षीरसागर, अमित जाधव, सागर कांबळे, सुजाता माने व इतर विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.



# SEMINAR ON PERSONALITY DEVELOPMENT

NSS unit of DPCOE organizes a seminar on personality development.

50 Students were present for the seminar.

## सिद्धांतावरच यशाचे गमक अवलंबून : प्रा. साखरे

**पुणे । प्रतिनिधी**

इच्छित यशापर्यंत सुखरूपपणे पोहोचण्यासाठी काही सिद्धांत पाळावेच लागतात. या सिद्धांतावरच यशाचे गमक अवलंबून असते. असे मत प्रा. निखील साखरे यांनी व्यक्त केले.

ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, खराडी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होते.

या कार्यशाळेमधून विद्यार्थ्यांना यश प्राप्ती, वेळेचे सुयोग्य नियोजन, जीवन प्रेरणा, ताण तणाव व्यवस्थापन, व्यक्तीमत्व विकास आदी विषयक सिद्धांताचा लाभ झाला. या कार्यशाळेस ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन सागर ढोले पाटील यांची उपस्थित होती. पुढे बोलतांना प्रा.निखील साखरे म्हणाले, ज्ञानेश्वरीत जसा उल्लेख आहे तसंच विज्ञानाने देखील हे सिद्ध केले आहे, की प्रत्येक सजीव किंवा निर्जीव वस्तू, मग ती जड, द्रव्य किंवा वायू कोणत्याही रूपात असो तिच्या आतमध्ये स्पंदने असतात, ऊर्जा असते आणि ही एकाच पद्धतीची ऊर्जा असते फक्त तिचे वरकरणी रूप वेगळे असते. म्हणजेच काय तर आपल्या नजरेस आपल्याला जे काही दिसतं किंवा या सृष्टीत जे काही दृश्य –अदृश्य स्वरूपात अस्तित्यात आहे. त्या सगळ्यांमध्ये एकच ऊर्जा कार्यरत आहे.

आपण सगळे एक आहोत, एकमेकांशी जोडलेले आहोत आणि याचा अनुभव आपल्याला पावलोपावली येत असतो. हे जेवढे वैश्विक सिद्धांत आहेत ते सर्व नैसर्गिक आहेत व ते सर्वांसाठी समान असतात. ते चांगलं – वाईट, लहान – मोठा, गरीब – श्रीमंत या भेदभाव करत नाहीत. असेही ते म्हणाले.



ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, खराडी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. निखील साखरे (छाया : श्रीकांत बोरावके)

## DR.BABASAHEB AMBEDKAR JAYANTI

On 14th April 2016, NSS unit organized the Ambedkar Jayanti program in Dhole Patil College of Engineering.

32 students were present for the program.



# SOCIAL AWARENESS RALLY

NSS unit of Dhole Patil College organized Social Awareness rally in the Tadiwala road area.

Students perform street play aimed at spreading awareness about social issues like drugs de-addiction, save girl child, etc.



College Activity

## ढोले पाटील अभियांत्रिकीच्या वतीने जनजागृती फेरी

राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त ढोले पाटील अभियांत्रिकीच्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांच्या वतीने ढोले पाटील रस्ता ते ताडीवाला रोड परिसरात जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीद्वारे वृक्षसंवर्धन, पाणी बचत, रक्तदान, स्त्रीभ्रूणहत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तरुणांमध्ये वाढती व्यसनाधीनता, स्वच्छ भारत अभियान आदी विषयांवर बोधपर पथनाट्य सादर करण्यात आली. त्याचप्रमाणे रांगोळीच्या माध्यमातूनही जनजागृती करण्यात आली. जनजागृती फेरीचे उद्घाटन ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन सागर ढोले पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कार्यक्रम संयोजक प्रा. श्रीकांत जगताप, विद्यार्थी प्रतिनिधी नयन वाघ, सागर कांबळे, ओंकार जगदाळे, दीक्षा धानोरकर, अमित जाधव, सुजाता माने आदी उपस्थित होते.

# SHAHU MAHARAJ JAYANTI

In the remembrance of Shahu Maharaj, NSS dept organized Birth anniversary of Shahu Maharaj.

## 'ढोले पाटील'मध्ये कार्यक्रम

ढोले पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. प्रकाश माळी यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची ओळख करून दिली. संस्थेचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, प्राचार्य सतीश अल्लमपल्लेवार, उपप्राचार्य प्रा. अभिजित दंडवते, प्रा. सिद्धराज अल्लूरकर, आदी या वेळी उपस्थित होते.

# YOGA DAY

NSS unit organized a seminar on Yoga Day in DPCOE. 50 students were participated in the Yoga Day celebration.

## ढोले पाटील अभियांत्रिकीत योगदिन उत्साहात

**पुणे** । जागतिक योगदिनाच्या निमित्तान ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय वाघोली येथे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या योग दिनाच्या कार्यक्रमाला लोणावळा येथील कैवल्यधामचे प्रा.अतुल गोरे यांनी भेट देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश आल्लमपल्लेवार, क्रिडा विभागाचे प्रा.दिपक पिंगळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रकाश माळी उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा.गोरे म्हणाले कि योग ही निरोगी आणि आरोग्यदायी जीवनाची गुरुकिल्ली आहे. नियमित योगसाधना केल्यास आपले आरोग्य सुदृढ राहतेच पण त्याच बरोबर व्यक्तिमत्वही प्रसन्न आणि आकर्षक राहण्यास मदत होते. योगाला तणाव मुक्तिचा राजमार्गही म्हणता येईल.

## ■ योगदिन उत्साहात साजरा

**पुणे :** जागतिक योगदिनाच्या निमित्ताने वाघोली येथील ढोले-पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत योगदिन साजरा करण्यात आला. या योगदिनाच्या कार्यक्रमाला लोणावळा येथील कैवल्यधामचे प्रा. अतुल गोरे यांनी भेट देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश आल्लमपल्लेवार, क्रीडा विभागाचे प्रा. दीपक पिंगळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रकाश माळी उपस्थित होते.

तावर, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ढोले पाटील अभियांत्रिकीत योगदिन साजरा

**पुणे –** जागतिक योगदिनाच्या निमित्ताने ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय वाघोली येथे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत योगदिन साजरा करण्यात आला. लोणावळा येथील कैवल्यधामचे प्रा. अतुल गोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश आल्लमपल्लेवार, क्रीडा विभागाचे प्रा. दीपक पिंगळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रकाश माळी उपस्थित होते. प्रा.गोरे म्हणाले की, योग ही निरोगी आणि आरोग्यदायी जीवनाची गुरुकिल्ली आहे. नियमित योगसाधना केल्यास आपले आरोग्य सुदृढ राहते आणि व्यक्तिमत्त्वही प्रसन्न राहण्यास मदत होते. योगाला तणावमुक्तीचा राजमार्गही म्हणता येईल.

प्रभात
Wed, 24 June 2015
epaper.eprabhat.net/c/566295